नांदेड जिल्हा बँकेला एक तपानंतर चव्हाण यांच्या सत्काराची आठवण

संजीव कुळकर्णी, लोकसत्ता

नांदेड : काँग्रेस नेते अशोक चव्हाण यांनी त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात नांदेड जिल्हा बँकेवरील १०० कोटींच्या कर्जाचे अनुदानात रूपांतर केले होते. त्याबद्दल आता तब्बल एक तपानंतर बँकेच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने त्यांचा रविवारी सत्कार करण्यात येणार आहे!

दीडशेहून अधिक शाखांचे जाळे असलेली ही बँक २००४-०५ च्या दरम्यान अक्षरशः 'कोमा'त गेल्यामुळे रिझर्व्ह बँकेच्या आदेशानुसार राज्याच्या सहकार खात्याने बँकेवरील तत्कालीन संचालक मंडळ बरखास्त करून आधी प्रशासक आणि मग प्रशासकीय मंडळाची नियुक्ती केली होती. तत्कालीन जिल्हाधिकारी राधेश्याम मोपलवार हे पहिल्या प्रशासक मंडळाचे अध्यक्ष होते. बँकेला आर्थिक गर्तेतून बाहेर काढण्यासाठी त्यांनी शासनाकडे एक अहवाल सादर केला होता. त्यानुसार तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी खास बाब म्हणून या बँकेला १०० कोटी रुपये कर्ज रूपाने दिले. नंतरच्या काळात अशोक चव्हाण यांच्याकडे मुख्यमंत्रीपद आल्यानंतर त्यांनी १०० कोटींच्या कर्जाचे अनुदानात रूपांतर केल्याने ही बँक पूर्वपदावर आली. चव्हाणांच्या या निर्णयाबद्दल रविवारी त्यांचा सत्कार करण्यात येत आहे.

अशोक चव्हाण यांनी बँकेच्या संदर्भात महत्त्वाचा निर्णय घेतला, तरी प्रशासकीय राजवट संपल्यानंतर बँकेवर आलेल्या लोकनियुक्त कारभाऱ्यांतील काहींनी विशेषतः प्रताप पाटील चिखलीकर यांनी मात्र जाणीवपूर्वक विलासरावांच्या नावाचा जप करत १०० कोटींच्या मदतीचे श्रेय त्यांनाच दिले. पण आता बँकेमध्ये चव्हाण गटाचे वर्चस्व असून या गटातील संचालकांच्या पुढाकारातून शताब्दी कार्यक्रमामध्ये चव्हाण यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

पंचावन्न हजारांवर युनिटची वीजचोरी

छत्रपती संभाजीनगर : आकडा टाकून वीजचोरी करण्यात येत असल्याचा प्रकार महावितरणच्या भरारी पथकाच्या छाप्यात उघड झाला. ५९ हजार ६५२ युनिटची वीज चोरी करून महावितरणचे ८ लाख ६१ हजार ७२२ रुपयांचे नुकसान केल्याप्रकरणी ग्राहक सिद्दीकी मोहम्मद इरफान व वापरकर्ते शेख गास शेख मुसा, यांच्याविरुद्ध सिडको पोलीस ठाण्यात शुक्रवारी सायंकाळी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी महावितरणचे उपकार्यकारी अभियंता सूरज सुनील घेवारे यांनी तक्रार दाखल केली आहे. घेवारे यांच्या पथकाला चिकलठाणा परिसरातील आरोपींकडील मीटर सर्किट पीसीबी ते आर व वाय फेजच्या वीजवाहिनीवर आकडा टाकून वीजचोरी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले.

जलवाहिनी फुटल्याने पाणीपुरवठा विस्कळीत

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर: शहरास पाणी पुरवठा करणाऱ्या १०० दशलक्ष लीटर योजनेच्या फारोळा येथील पंपगृहातील पाईप तुटल्यामुळे पंपगृहातील इतर यंत्रणांमध्ये पाणी शिरले.यामुळे तत्काळ पंपिंग बंद करून शहराचा पाणी पुरवठा बंद करण्यात आला. दुरुस्तीच्या कामाला ८ ते १० तास लागणार असल्यामुळे शहराचा पाणी पुरवठा दोन दिवस विस्कळीत होईल असा अंदाज आहे.

शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या ७०० व १४०० मिमी व्यासाच्या दोन्ही योजना जीर्ण झाल्या असून वारंवार फुटत असल्याने पाणी पुरवठा विस्कळीत होत आहे.

आठ दिवसापूर्वीच रस्त्याच्या कामात जेसीबीचा धक्का लागून मुख्य जलवाहिनीवरील व्हॉल्व्ह फुटला. त्यामुळे शहराचा पाणी पुरवठा विस्कळीत झाल्यामुळे तो आजपर्यंत सुरळीत झालेला नाही. त्यापाठोपाठ आज शनिवारी शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या १०० दशलक्ष लिटर क्षमतेच्या योजनेवरील नवीन फारोळा पंपगृह येथे सकाळी ८.४० वाजेच्या दरम्यान पंप क्रमांक ४ (६७० अश्वशक्ती) येथील पाईप तुटल्यामुळे पंपगृहात पाणी शिरले. यामुळे तत्काळ पाणी उपसा थांबवावा लागला. या कामाच्या दुरुस्तीस ८ ते १० तास कालावधी लागू शकेल असे महापालिको अधिकारी सांगत आहेत. दुरुस्ती कामासाठी १५ तास शहराचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त सलग १२६ तास नृत्याविष्कार!

सृष्टी जगताप अनोखी मानवंदना देणार

लातूर : स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त शास्त्रीय नृत्य व कथकविशारद सृष्टी सुधीर जगताप ही लातूरची कन्या २९ मे ते ३ जून २०२३ या कालावधीत सलग १२६ तास नृत्याविष्कार सादर करीत भारतमातेला मानवंदना देणार आहे.

या कलाविष्काराचा प्रारंभ दयानंद शिक्षण संस्थेच्या सभागृहात २९ मे रोजी सायंकाळी सहाला होणार असून, सृष्टीच्या या अभिनव उपक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये होणार आहे. सृष्टी वयाच्या तिसऱ्या वर्षापासून नृत्य करते. ती सध्या दयानंद महाविद्यालयात अकरावीच्या वर्गात शिकत आहे. यापूर्वी तिने जिल्हा व राज्य पातळीवर अनेक उपक्रम केले आहेत. तिला अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. २०१३ व २०१४ मध्ये दुबई व हँगकाँग येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय कल्चरल ऑलिंपियाडमध्ये तिने भारताचे प्रतिनिधित्व करत लातूरचे नाव साता समुद्रापार नेले आहे.

सृष्टी अनेक कलांत पारंगत असून, तिने विविध कार्यक्रमांतून आपले नाव कोरले आहे. महाराष्ट्राची लोककला म्हणून ओळखणाऱ्या मराठमोळ्या लावणीला आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिष्ठा मिळवून देत तिने आशिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये आपले नाव नोंदवले आहे.

सलग सर्वाधिक वेळ नृत्य करण्याची श्रीमती सोनी चौरसिया यांची गिनीज बुकमध्ये नोंद आहे. मध्यंतरीच्या काळात हे रेकॉर्ड नेपाळ या देशाने मोडीत काढले होते.

गुणवत्तापूर्ण शहरात लातूरचा समावेश हवा – अमित देशमुख

लोकसत्ता वार्ताहर

CREDAI
LATUR
2023-2025
Oath Ceremony

लातूर : लातूर शहर हे झपाट्याने वाढणारे शहर म्हणून नावारूपाला येत असून शहराचा नावलौकिक लोकनेते विलासराव देशमुख यांच्यामुळे मोठ्या प्रमाणावर झाला आहे. लातूर क्रेडाईने आता शहराची ओळख योग्य पद्धतीने होण्यासाठी गुणवत्तापूर्ण शहरात लातूरची भर व्हावी यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, अशी अपेक्षा माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी व्यक्त केली.

लातूर क्रिडाई २०२३ -२५ पदग्रहण सोहळ्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर मनपाचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे ,महाराष्ट्र क्रेडाईचे अध्यक्ष प्रमोद खैरनार, क्रेडाई राष्ट्रीय उपाध्यक्ष सुनील फुरडे, सहसचिव डॉक्टर धर्मवीर भारती, लातूर क्रेडाई नूतन अध्यक्ष जगदीश कुलकर्णी, सचिव संतोष हत्ते आदी मान्यवर उपस्थित होते. आमदार अमित देशमुख म्हणाले,की क्रेडाईमध्ये अतिशय सुरेख पद्धतीने पदग्रहण समारंभ होतो. माजी अध्यक्ष नूतन अध्यक्षाला आपला पदभार देतो. राजकारणात हे फार अवघड असते, तिकडे पदालाच ग्रहण लागते. योग्य वेळी काळजी घेतली नाही तर हातचे पद निसटून जाते, या शब्दात कोटी करत क्रेडाईने लातूरमध्ये चांगल्या पद्धतीने कामे केली पाहिजेत. अवैध पद्धतीचे काम होणारच नाही असा निर्णय घेतला तर गुणवत्तापूर्ण शहर म्हणून लातूरची ओळख निर्माण होईल. यासाठी क्रेडाईने योगदान देण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. याप्रसंगी आमदार देशमुख यांच्या हस्ते उदय पाटील ,अमोल मुळे, आदी पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. पापाशेठ ताथोडे व संजय पांडे यांनी क्रेडाई कार्यालयासाठी जागा देण्याचे जाहीर केले म्हणून त्यांचाही सत्कार करण्यात आला.

वाढते तापमान, तुडतुड्या रोगाचा टोमॅटोला फटका; उठाव-निर्यात मंदावली

लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : देशपातळीवर अनेक भागांत झालेले टोमॅटोचे उत्पादन आणि इतर भागांत निर्यात करताना वाढत्या तापमानाची परिस्थिती पाहता मालाचा उठाव मंदावला आहे. परिणामी दर कोसळले असून त्यामुळे शेतकरी टोमॅटो अक्षरशः फेकून देत आहेत. अनेक ठिकाणी टोमटोंवर तुडतुड्या रोगाचाही प्रादुर्भाव झाला आहे.

भाजीपाल्याची आवक करण्यासाठी २२ ते ३५ अंश सेल्सिअसपर्यंत तापमान लागते. मात्र, सध्या तापमान ४० अंशांपुढे सरकले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातून दिल्ली, अमृतसर, जैसलमेर, अजमेर किंवा कोलकाता आदी ठिकाणांपर्यंत माल पोहोचेपर्यंत सडला जाण्याचीच शक्यता अधिक असल्याने मोठ्या व्यापाऱ्यांनी महाराष्ट्रात येऊन करण्यात येणारी खरेदी थांबवली आहे. एका ट्रकमागे एक लाखांपर्यंतचे भाडे देऊनही माल खराब होणार असेल तर कोण खरेदी करेल, असा रोकडा सवाल दिल्लीचे व्यापारी मॅनेजर सिंग यांनी केला आहे.

मॅनेजर सिंग यांच्या मते देशात यंदा टोमॅटोचे मोठ्या प्रमाणात उत्पादन झाले आहे. दिल्लीच्या शेजारी हरियाणा, मध्यप्रदेश, गुजरात, अशा राज्यांमध्ये टोमॅटोचे मोठे उत्पादन झालेले आहे. हरिणायातून माल मागवला तर तो ३० ते ४० रुपये कॅरेटने (२५ किलोचे) मिळतो आहे. महाराष्ट्रातून माल मागवला तर तो १५० ते १६० रुपये कॅरेटने पडतो आहे. कन्नड तालुक्यातील ताडपिंपळगाव व इतर भागातून मॅनेजर सिंग हे टोमॅटोंची खरेदी करतात. दरवर्षी मे आणि जूनमध्ये तापमानाच्या कारणास्तव व्यापारी माल खरेदी करण्याची हिंमत दाखवत नाहीत. शिमला मिरची, भेंडी, अशा भाज्यांचेही दरही कमालीचे घसरल्याचे व्यापारी मॅनेजर सिंग यांनी सांगितले.

वरुड काझी येथील टोमॅटो उत्पादक श्रीमंत दांडगे म्हणाले, दर आणि तुडतुड्या रोग, असे दुहेरी संकट यंदा शेतकऱ्यांवर कोसळले आहे. तुडतुड्या रोगाने पूर्ण फडच्या फड नेस्तनाबूत होत आहेत. बाजारात दरही कोसळले असून दीडशे रुपये कॅरेटने व्यापारी मागत आहेत. त्यात तर शंभर रुपये खर्चच चालला आहे. मागील तीन वर्षांपासून टोमॅटोचे दोन्ही-तिन्ही हंगामात नुकसानच हाती आले आहे. शेती विकायची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. वरुड काझीमध्ये साधारण एक हजार एकरवर टोमॅटोची लागवड झालेली असून दरामुळे शेतकरी येत्या ७ जूनपासून पुन्हा लागवड करायची का, असा विचार करत आहेत.

इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लि.

(पूर्वी इक्विटास फायनान्स लि. म्हणून ज्ञात)
कॉर्पोरेट कार्यालय : क्र. ७६९, स्पेन्सर प्लाझा, ४ था मजला, फेज-II, अण्णा सळई, चेन्नई, तामीळनाडू-६०० ००२. #०४४-४२९९५०००, ०४४-४२९९५०५०

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेसाठी नियम ८(१) नुसार)

ज्याअर्थी, मेसर्स इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी दी सिक्युरिटायजेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट [अधिनियम, २००२ (२००२ चा ५४)] नुसार आणि दी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या [नियम ३] सोबत वाचावयाच्या कलम १३(१२) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांची अंमलबजावणी करताना डिमांड नोटीस निर्गमित करून निम्नोल्लेखित कर्जदारांना, उक्त सूचना मिळावयाच्या तारखेपासून ६० दिवसांत सूचनेमध्ये नमूद केलेल्या एकूण अदत्त रकमेची परतफेड करण्यास फर्माविले. निम्नोल्लेखित कर्जदारांनी विहित कालावधीत निम्ननिर्दिष्ट रकमेची परतफेड केली नसल्यामुळे निम्नोल्लेखित कर्जदारांना आणि सामान्य जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, दी सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ च्या नियम ८ सोबत वाचावयाच्या उक्त अधिनियमाच्या कलम १३ च्या पोट-कलम (४) अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांची अंमलबजावणी करताना निम्नस्वाक्षरीकारांनी, येथील निम्नवर्णित मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषत: कर्जदारांना आणि सामान्यत: जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की, अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मालमत्तांचा खरेदी-विक्री व्यवहार करू नये आणि या मालमत्तांचा कोणताही खरेदी-विक्री व्यवहार हा मेसर्स इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड यांच्या भारासापेक्ष राहील व त्यावरील पुढील व्याज आणि अन्य आकार यांच्या भारासापेक्ष राहील. ''प्रतिभूत मत्ता सोडवून घेण्याकरिता उपलब्ध असलेल्या कालावधीच्या बाबतीत, अधिनियमाच्या कलम १३ च्या पोटकलम (८) च्या उपबंधांकडे कर्जदाराचे लक्ष वेधण्यात येत आहे.''

अ. क्र.	कर्जदाराचे / हमीदाराचे नाव	प्रतिभूत मत्तेचे (स्थावर मालमत्तेचे) वर्णन	डिमांड नोटीसची तारीख व रक्कम	लाक्षणिक ताबा घेण्याची तारीख
१.	शाखा: निलंगा एल. नं.. एसईएनएलएनजीए०३१५९७० कर्जदार : श्रीमती मीना नरसिंग घोटाळे सह-कर्जदार : श्री. नरसिंग हणमंतराव घोटाळे	ग्रामपंचायत तालिखेड ता. निलरीगा, जि. लातूर येथे स्थित ६२.७३ चौ.मी. म्हणजेच ६७५ चौ. फूट क्षेत्रफळाच्या, ग्रामपंचायत मिळकत क्र. ३०० धारण करणाऱ्या मालमत्तेचे सर्व हिस्से आणि तुकडे. उत्तरेला : रस्ता. दक्षिणेला : महादेव मंदिर, पूर्वेला : रस्ता. पश्चिमेला : हणमंत घोटाळे यांचे घर. क्षेत्रफळ : ६७५ चौ.फूट. उप-नोंदणी जिल्हा निलंगा आणि नोंदणी जिल्हा लातूरअंतर्गत स्थित.	०२.०१.२०२३ आणि रु. ६४५४७७/-	२४.०५.२०२३

दिनांक : २८.०५.२०२३, स्थळ : लातूर
प्राधिकृत अधिकारी, इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लि.

पंजाब नैशनल बैंक | pnb punjab national bank

ताबा सूचना

(अचल संपत्तीकरीता)

खालील सही करणाऱ्यांनी सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस् अॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ आणि सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटी इंटरेस्ट इन्फोर्समेंट नियम २००२ च्या कलम १३(३) चे अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन पंजाब नॅशनल बँकेचे अधिकृत अधिकारी या नात्याने संबंधित कर्जदारांना खालील लिहिलेल्या तारखेला मागणी सूचना दिली होती त्या सूचनेत नमूद केलेल्या रक्कमेची उक्त सूचना प्राप्त होणाऱ्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परतफेड करण्याची मागणी सूचना प्रस्तूत केले.

कर्जदार हे रकमेची परतफेड करण्यास अपयशी ठरल्याने कर्जदार / तारणदार / जामीनदार व सर्व सभासद जनतेला एतव्दारा सूचना देण्यात येते की खालील सही करणाऱ्याने उपरोक्त नियमाचा ८ सह वाचल्या जाणाऱ्या उपरोक्त कायदयाचा १३ (४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन यात खालील वर्णन केलेल्या संपत्तीचा सांकेतिक ताबा घेतलेला आहे.

कर्जदार व सर्व जनतेस सूचित करण्यात येते की, नमूद केलेली मिळकतीबाबत कोणीही कसल्याही प्रकारचा व्यवहार करु नये याउपर कोणीही सदर मालमत्तेशी व्यवहार केल्यास तो व्यवहार पंजाब नॅशनल बँक यांच्या खाली नमूद रक्कम अधिक व्याजाच्या बोझासहित असेल.

सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यसाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात कायदयाच्या कलम १३ च्या उपकलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदार /तारणदाराचे लक्ष वेधण्यात येत आहे.

शाखेचे नाव	कर्जदार / खातेधारकाचे नाव	संबंधित नाव (संपत्ती मालकाचे नाव)	गहाण ठेवलेल्या संपत्तीचे विवरण	डिमांड नोटीस तारीख	सांकेतिक ताबा घेण्याची तारीख	कर्जाची बकाया रक्कम
(७१०४००) हिंगोली	श्री. कुंडलिक आत्माराम गवई आणि जामीनदार - श्रीमती चंद्रभागा उत्तम इंगळे	श्री. कुंडलिक आत्माराम गवई	प्लॉट नं.४५, एम.सी. मालमत्ता नं. ४-१४२९, सिटीएस नं. २७५९, सर्व्हे नं. ९, एकुण क्षेत्र १०८ स्क्वे.मी., मल्हारवाडी, कमला नगर, जि. हिंगोली - ४३१५१३ चतुर्सिमा - पुर्व - ९ मी. लेआऊट रस्ता, पश्चिम - प्लॉट नं. ३५ आणि ३६, उत्तर - प्लॉट नं. ४४, दक्षिण - प्लॉट नं. ४६	०६.०१.२०२३	२६.०५.२०२३	रु. ०६,१०,९६१.३३ १६/०१/२०२३ पर्यंत + त्यानंतर व्याज व इतर खर्च

दिनांक : २८/०५/२०२३
ठिकाण : नाशिक
स्वैर भाषांतर : तफावत आढळल्यास मुळ इंग्रजी मजकूर ग्राहय
स्वाक्षरी/-
सुमेध पाईकराव
मुख्य प्रबंधक व अधिकृत अधिकारी
पंजाब नॅशनल बँक

OFFICE OF THE RETURNING OFFICER

SVC CO-OPERATIVE BANK LTD.

(Multi-State Scheduled Bank)
ESTD.1906
Corporate Office: SVC Tower, J. Nehru Road, Vakola, Santacruz (East), Mumbai - 400 055.
(Multi-State Scheduled Co-operative Bank)

NOTICE OF ELECTION TO THE BOARD OF DIRECTORS OF SVC CO-OPERATIVE BANK LIMITED FOR THE 5 (FIVE) YEAR PERIOD i.e. 2023-24 to 2028-29

I, Shri Jayant D. Patil, Deputy Registrar, Co-operative Societies, Mumbai, appointed as the Returning Officer by the Board of Directors of SVC Co-operative Bank Ltd, in terms of the provisions of the amended Rule 19 of The Multi State Co-operative Societies Rules, 2002 had notified and published the Election Programme on 15 th April 2023. Further to the said notice, I hereby declare the names of the polling centres which were not included in the earlier notice published by me. The following additional polling centres situated in the Branch Premises are as under:

1. Vijayawada, 2) New Delhi- East Patel Nagar, 3) Faridabad, 4) Jodhpur, 5) Madgaon, 6) Karelibaug, Vadodara (Baroda), 7)Udupi, 8) Bhopal, 9) Chinchwad, 10) Aundh, 11) Wanowri, 12) Bhosari, 13) Salem, 14) Coimbatore, 15) Chennai-Nungambakkam, 16) Secunderabad, 17) Solapur and 18) Amravati.
2. The above polling centres are in addition to the polling centres declared in the notice dated 15th April 2023.
3. Polling will be held simultaneously from 08.30 a.m. to 04.30 p.m. at all the polling centres.
4. Result of election will be declared at the General Body Meeting to be held at **NMIMS Gate Number 4 , Mukesh Patel Auditorium, Navyug Society,Navpada, JVPD Scheme, Opposite Mithibai College, Vile Parle (W), Mumbai - 400056 on Thursday 22nd June 2023** from 02.30 p.m. onwards.
5. Voters are advised to vote at any polling centre mentioned in Notice dated 15th April 2023 and the ones mentioned in point no.1 above and are advised to bring any one of their own Photo Identity-Card viz Passport, Driving License, Voter's Card issued by Election Commission, Aadhaar Card and PAN card during voting to prove their identity.
6. Voting by "Proxy" is prohibited.
7. Non-Individual Regular Members will be permitted to vote based on the authority letter/ Resolution issued by the regular member entity.

Address of the Election Office
SVC Co-operative Bank Ltd.
2nd floor, SVC Tower, Jawaharlal Nehru Road,
Vakola, Santacruz (E), Mumbai - 400 055.
Tel. No. (022) 66 999 739
Place : Mumbai
Date : 27-05-2023.

Sd/-
Shri. Jayant D. Patil
Returning Officer
SVC Co-Op. Bank Ltd.
& Deputy Registrar,
Co-Operative Societies, Mumbai

स्टेट बँक ऑफ इंडिया

(एसएएमबी) स्ट्रेस्ड अॅसेट्स मॅनेजमेंट ब्रँच-II, रहेजा चेंबर्स, तळमजला व पहिला मजला, विंग-बी, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. फोन : २२८१ १४८५; फॅक्स : २२८१ १४०१; ईमेल : sbi.15859@sbi.co.in

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता) [(रुल ८(१)]

ज्याअर्थी, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ (२००२ चा नं. ३) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ३ यासह वाचलेल्या सेक्शन १३(१२) अंतर्गत "स्टेट बँक ऑफ इंडिया"चे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत पुढील व्याज अधिक **२९.११.२०२२ रोजीप्रमाणे** एकूण **रु. ४३,३३,३९,५९७/- (रुपये त्रेचाळीस कोटी तेहतीस लाख एकोणचाळीस हजार पाचशे सत्याण्णव फक्त)** सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याकरिता ऋणको व हमीदार- **मेसर्स गीता रिफायनरी प्रा. लि., श्री. आशिष ओमप्रकाश मंत्री, श्रीमती प्रमिला ओमप्रकाश मंत्री, श्री. प्रदिप बाबूलाल तोतला, श्री. ओमप्रकाश मंत्री, श्री. अतुल ओमप्रकाश मंत्री, श्री. हर्षद मदनलालजी चोरडिया, मेसर्स अभय ऑईल इंडस्ट्रिज** यांच्यावर फर्माविणारी दिनांकित ३०.११.२०२२ मागणी सूचना निर्गमित केली आहे.

ऋणको/ हमीदार रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत, याद्वारा ऋणको / हमीदार तसेच आम जनतेस सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी **२४ मे, २०२३** रोजी उक्त रुल्सच्या रुल ८ यासह वाचलेल्या उक्त अॅक्टच्या सेक्शन १३(४) अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली वर्णिलेल्या मालमत्तेचा **सांकेतिक ताबा** घेतला आहे.

विशेषकरून ऋणको / सुरक्षित ऋणको आणि आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की, त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार पुढील व्याज व किंमत अधिक **रु. ४३,३३,३९,५९७/-** या रकमेकरिता "स्टेट बँक ऑफ इंडिया"च्या आकाराच्या विषयाधीन असणार आहे.

सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनाकरिता सर्फेसी अॅक्टच्या सेक्शन १३ च्या सब-सेक्शन (८)च्या तरतुदींकडे ऋणकोचे लक्ष वेधीत आहोत.

****** स्थावर मालमत्तेचे वर्णन ******

१. पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - रेसिडेंशियल बिल्डिंग, येथे स्थित - सीटीएस नं. ४११८/३५ (पार्ट), सर्व्हे नं. २४५ (पार्ट), शीट नं. ५४ व ५५, सिव्हिल क्लबजवळ, कारवा नगर, ता. व जि. जालना (एम.एस.), मोजमापाची १२६.१७ चौ.मी., श्री. हर्षल मदनलाल चोरडिया यांच्या मालकीची व पुढीलप्रमाणे सिमित : **पूर्व** : प्लॉट नं. २८, **पश्चिम** : सीटीएस नं. ४११८/३३५ (पार्ट), **उत्तर** : प्लॉट नं. ३४, **दक्षिण** : रोड.

२. पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - रेसिडेंशियल बंगलो, प्लॉट नं. २६, २७, २८, २९, सीटीएस नं. १११३२/ डी-२६+२७+२८+२९, सर्व्हे नं. ५४६/२+३ व २७३ (पार्ट) यावर बांधकाम केलेला, महालक्ष्मी नगर, औरंगाबाद नागपूर रोडजवळ, जि. जालना, प्रत्येक प्लॉट मोजमापाचा १८० चौ.मी. प्लॉट नं. २६ व २७ श्रीमती प्रमिला मंत्री यांच्या मालकीचे व प्लॉट नं. २८ व २९ **श्री. ओमप्रकाश मंत्री** यांच्या मालकीचे. पुढीलप्रमाणे सिमित : **प्लॉट नं. २६ व २७ :- पूर्व** : ९ मी. रुंद रोड, **पश्चिम** : सीटीएस नं. १११३२/डी-१८ व सीटीएस नं. १११३२/ डी-१९, **दक्षिण** : सीटीएस नं. १११३२/डी-२५, **उत्तर** : सीटीएस नं. १११३२/डी-२८. **प्लॉट नं. २८ व २९ :- पूर्व** : ९ मी. रुंद रोड, **पश्चिम** : सीटीएस नं. १११३२/डी-२० व सीटीएस नं. १११३२/ डी-२१, **दक्षिण** : सीटीएस नं. १११३२/डी-२७, **उत्तर** : ६ मी. रुंद रोड.

३. पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - प्लॉट नं. सी-२३/१, जालना म्युनिसिपल काउंसिल एमआयडीसी जालना, ता. व जि. जालना, मोजमापाचा ७१२२ चौ.मी. मेसर्स अभय ऑईल इंडस्ट्रिजच्या मालकीचा. पुढीलप्रमाणे सिमित : **पूर्व** : एमआयडीसी बाउंड्री, **पश्चिम** : प्लॉट नं. सी-२३/२ व सी-२३/३, **दक्षिण** : प्लॉट नं. सी-२३/४, **उत्तर** : एमआयडीसी रोड व प्लॉट नं. सी-२२.

तारीख : २४.०५.२०२३
स्थळ : जालना
स्वाक्षरी/-
प्राधिकृत अधिकारी, स्टेट बँक ऑफ इंडिया

स्टेट बँक ऑफ इंडिया

(एसएएमबी) स्ट्रेस्ड अॅसेट्स मॅनेजमेंट ब्रँच-II, रहेजा चेंबर्स, तळमजला व पहिला मजला, विंग-बी, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. फोन : २२८१ १४८५; फॅक्स : २२८१ १४०१; ईमेल : sbi.15859@sbi.co.in

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता) [(रुल ८(१)]

ज्याअर्थी, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ (२००२ चा नं. ३) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ३ यासह वाचलेल्या सेक्शन १३(१२) अंतर्गत "स्टेट बँक ऑफ इंडिया"चे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत पुढील व्याज अधिक **२९.११.२०२२ रोजीप्रमाणे** एकूण **रु. ४३,३३,३९,५९७/- (रुपये त्रेचाळीस कोटी तेहतीस लाख एकोणचाळीस हजार पाचशे सत्याण्णव फक्त)** सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याकरिता ऋणको व हमीदार - **मेसर्स गीता रिफायनरी प्रा. लि., श्री. आशिष ओमप्रकाश मंत्री, श्रीमती प्रमिला ओमप्रकाश मंत्री, श्री. प्रदिप बाबूलाल तोतला, श्री. ओमप्रकाश मंत्री, श्री. अतुल ओमप्रकाश मंत्री, श्री. हर्षद मदनलालजी चोरडिया, मेसर्स अभय ऑईल इंडस्ट्रिज** यांच्यावर फर्माविणारी दिनांकित ३०.११.२०२२ मागणी सूचना निर्गमित केली आहे.

ऋणको / हमीदार रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत, याद्वारा ऋणको / हमीदार तसेच आम जनतेस सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी **२४ मे, २०२३** रोजी उक्त रुल्सच्या रुल ८ यासह वाचलेल्या उक्त अॅक्टच्या सेक्शन १३(४) अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली वर्णिलेल्या मालमत्तेचा **प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे.

विशेषकरून ऋणको / सुरक्षित ऋणको आणि आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की, त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार पुढील व्याज व किंमत अधिक **रु. ४३,३३,३९,५९७/-** या रकमेकरिता "स्टेट बँक ऑफ इंडिया"च्या आकाराच्या विषयाधीन असणार आहे.

सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनाकरिता सर्फेसी अॅक्टच्या सेक्शन १३ च्या सब-सेक्शन (८)च्या तरतुदींकडे ऋणकोचे लक्ष वेधीत आहोत.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - प्लॉट नं. १ ते ५४, गट नं. २९२, व्हिलेज राममुर्ती, ता. व जि. जालना, एकूण मोजमापाचे १३९४१ चौ.मी. श्री. अतुल ओमप्रकाश मंत्री यांच्या नावे असलेले. सामायिक सीमा :
प्लॉट नं. १ ते ९ :- पूर्व : जमीन गट नं. २१४, **पश्चिम** : लेआउटची ओपन स्पेस, **दक्षिण** : १२ मी. रुंद इंटरनल लेआउट रोड, **उत्तर** : जमीन गट नं. २९२.
प्लॉट नं. १० ते २७ :- पूर्व : १५ मी. रुंद इंटरनल लेआउट रोड, **पश्चिम** : ९ मी. रुंद इंटरनल लेआउट रोड, **दक्षिण** : १२ मी. रुंद इंटरनल लेआउट रोड, **उत्तर** : १८ मी. रुंद इंटरनल लेआउट रोड.
प्लॉट नं. २८ ते ४९ :- पूर्व : ९ मी. रुंद इंटरनल लेआउट रोड, **पश्चिम** : ९ मी. रुंद इंटरनल लेआउट रोड, **दक्षिण** : १२ मी. रुंद इंटरनल लेआउट रोड, **उत्तर** : १८ मी. रुंद इंटरनल लेआउट रोड.
प्लॉट नं. ५० ते ५४ :- पूर्व : ९ मी. रुंद इंटरनल लेआउट रोड, **पश्चिम** : सदर लेआउटचा प्लॉट नं. ७१ ते ६७, **दक्षिण** : सदर लेआउटचा प्लॉट नं. ५५, **उत्तर** : १८ मी. रुंद इंटरनल लेआउट रोड.

तारीख : २४.०५.२०२३
स्थळ : जालना
स्वाक्षरी/-
प्राधिकृत अधिकारी, स्टेट बँक ऑफ इंडिया

स्टेट बँक ऑफ इंडिया

(एसएएमबी) स्ट्रेस्ड अॅसेट्स मॅनेजमेंट ब्रँच-II, रहेजा चेंबर्स, तळमजला व पहिला मजला, विंग-बी, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. फोन : २२८१ १४८५; फॅक्स : २२८१ १४०१; ईमेल : sbi.15859@sbi.co.in

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता) [(रुल ८(१)]

ज्याअर्थी, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ (२००२चा नं. ३) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ३ यासह वाचलेल्या सेक्शन १३(१२) अंतर्गत ''स्टेट बँक ऑफ इंडिया'' चे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत पुढील व्याज अधिक **१५.१०.२०२० रोजी प्रमाणे** एकूण **रु. १२०,५२,६६,७१५.९३ (रुपये एकशे वीस कोटी बावन्न लाख सहासष्ट हजार सातशे पंधरा व पैसे त्र्याण्णव फक्त)** सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याकरिता हमीदार - **मेसर्स अभय न्युट्रिशन प्रा. लि. - श्री. आशिष ओमप्रकाश मंत्री, श्री. अतुल ओमप्रकाश मंत्री, श्री. प्रदिप बाबूलाल तोतला, श्रीमती प्रमिला ओमप्रकाश मंत्री, श्री. ओमप्रकाश आसाराम मंत्री, श्री. दिपेश झुंबरलालजी पटनी, श्री. कचरूलाल कपूरचंद पटनी, श्री. अंजानेय प्रसाद दोड्डा, मेसर्स वृषभ कॉटन प्रा. लि., मेसर्स गीता रिफायनरी प्रा. लि.** यांच्यावर फर्माविणारी दिनांकित १५.१०.२०१९ मागणी सूचना निर्गमित केली आहे आणि २३.११.२०२० रोजी वृत्तपत्रांत म्हणजेच "टाईम्स ऑफ इंडिया" व "पुढारी" (औरंगाबाद आवृत्ती) यामध्ये प्रसिद्ध केली आहे.

ऋणको/ हमीदार रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत, याद्वारा ऋणको/ हमीदार तसेच आम जनतेस सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी **२४ मे, २०२३** रोजी उक्त रुल्सच्या रुल ८ यासह वाचलेल्या उक्त अॅक्टच्या सेक्शन १३(४) अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली वर्णिलेल्या मालमत्तेचा **प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे.

विशेषकरून ऋणको/ सुरक्षित ऋणको आणि आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की, त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार पुढील व्याज व किंमत अधिक **रु. १२०,५२,६६,७१५.९३** या रकमेकरिता "स्टेट बँक ऑफ इंडिया"च्या आकाराच्या विषयाधीन असणार आहे.

सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनाकरिता सर्फेसी अॅक्टच्या सेक्शन १३ च्या सब-सेक्शन (८)च्या तरतुदींकडे ऋणकोचे लक्ष वेधीत आहोत.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

१. पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - ओपन रेसिडेंशियल प्लॉट नं. ३५/१, मोजमापाचा ३१२४.९१ चौ.फू., सीटीएस नं. १०५८५/१ मधील, रेल्वे स्टेशन रोड, नगर परिषद जालनाच्या मर्यादेत, श्री. आशिष ओमप्रकाश मंत्री यांच्या नावे असलेला.
२. पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - ओपन रेसिडेंशियल प्लॉट नं. ३४, सीटीएस नं. १०५८५/१, रेल्वे स्टेशन रोड, नगर परिषद जालनाच्या मर्यादेत, मोजमापाचा एरिआ ४३७४.९० चौ.फू., श्री. ओमप्रकाश मंत्री यांच्या मालकीचा.
३. पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - ओपन प्लॉट नं. बी-३ (४५५ चौ.मी.), बी-४२ (२६० चौ.मी.), बी-६५ (२१६ चौ.मी.), बी-७६ (१४४ चौ.मी.), बी-१०१ (२१६ चौ.मी.), बी-११९ (२१६ चौ.मी.), बी-१४० (२१६ चौ.मी.), बी-१६२ (१८० चौ.मी.), बी-१९८ (१५० चौ.मी.), बी-२०३ (१५० चौ.मी.), बी-२२५ (१४३.३१ चौ.मी.), बी-२६५ (१४८.१७ चौ.मी.), सर्व्हे नं. ५०/२/२ व ५०/२/३, सीटीएस नं. ११४३५/८३, बरवाले कॉलेजच्या बाजूला, औरंगाबाद रोड, जालना, एरिआ - २४९४.४८ चौ.मी. श्रीमती प्रमिला ओमप्रकाश मंत्री यांच्या मालकीचा.
४. पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - ओपन प्लॉट नं. बी-४ (४५५ चौ.मी.), बी-४१ (२६० चौ.मी.), बी-६६ (२१६ चौ.मी.), बी-७७ (१४४ चौ.मी.), बी-१०२ (२१६ चौ.मी.), बी-१२० (२१६ चौ.मी.), बी-१४१ (२१६ चौ.मी.), बी-१६३ (१८० चौ.मी.), बी-१९९ (१५० चौ.मी.), बी-२०४ (१५० चौ.मी.), बी-२२६ (२२९.५४ चौ.मी.), बी-२६६ (१४४.९७ चौ.मी.), सर्व्हे नं. ५०/२/२ व ५०/२/३, सीटीएस नं. ११४३५/बी/४, बरवाले कॉलेजच्या बाजूला, औरंगाबाद रोड, जालना, एरिआ- २५७९.५१ चौ.मी. श्री. प्रदिप बाबूलाल तोतला यांच्या मालकीचा.
५. पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - प्लॉट्स बी-२६८ (एरिआ १५० चौ.मी.), बी-२६९ (एरिआ १५० चौ.मी.), सर्व्हे नं. ५०/२/२ व ५०/२/३, सीटीएस नं. ११४३५/बी२६८ व ११४३५/बी२६९, बरवाले कॉलेजच्या बाजूला, औरंगाबाद रोड, जालना, एरिआ - ३०० चौ.मी. श्री. ओमप्रकाश आसारामजी मंत्री यांच्या मालकीचा.

तारीख : २४.०५.२०२३
स्थळ : जालना
स्वाक्षरी/-
प्राधिकृत अधिकारी, स्टेट बँक ऑफ इंडिया

लोकसत्ता Classifieds
FROM ANYTHING TO EVERYTHING.

जागासंबंधी

गणपतीपुळे (रत्नागिरी) दहा किलोमीटरवर रोडटच ७.५ एकर्स जागा विकणे आहे. मालकाशी संपर्क- 7498771177.
0070844856-1

ALIBAUG Available for Sale 1 RK & 1/2/3BHK Flat 3/4BHK Villa & Banglow & also Land & NA Plot Call Viestar - 7977141894 / 7400070503
0070845125-1

यात्रा विशेष

यात्रासहल

नर्मदा परिक्रमा १६ नोव्हेंबर, श्रावण नर्मदा स्नान ५ ऑगस्ट, अनोखा आंध्र २ ऑक्टोबर, भूतान २५ ऑक्टोबर, बुकिंग सुरु, थोड्याच जागा शिल्लक. प्राची भिडे ९८८१४२८१२१.
0090325817-1

भविष्यविषयक

ॲस्ट्रॉलॉजीः गोल्ड मेडलिस्ट, जन्मकुंडली बनविणे, जुळविणे, जन्मकुंडलीवरून तसेच हस्तरेषा - चेहरा, फोटोवरून आपल्या प्रश्नांवर सविस्तर भविष्य तसेच वास्तुशास्त्राचे महत्त्व, वास्तुशांतीचे साधे-सोपे उपाय ५० पानांवर लिहून मिळतील. पाहिजे असल्यास हिंदी/ इंग्रजीमधून लिखाण मिळेल. (प्रश्नांची फी एकदाच सुरुवातीला स्वीकारतो.) नवग्रहांचे रत्ने, भाग्योदय यंत्रे, रुद्राक्ष इतर शुभवस्तू सुचवितो व अनुष्ठान करून दिले जातील. मुख्य कार्यालय श्री. सुधाकर सदानंद जोशी, कु. यशश्री सुधाकर जोशी. सोमवार ते शनिवार सकाळी १० ते संध्याकाळी ६. योगी निवास बंगला, पहिला मजला, किसन क्रॉस रोड, नवीन पोलीस क्वार्टर्सजवळ, मालाड (पश्चिम), मुंबई-४०००६४. ९८२०५५३२७६/ ९८२०६१२५७८. (वरील पत्त्याशिवाय आमची कुठेही शाखा अथवा प्रतिनिधी नाहीत.)
0070845411-1

जीवनसाथीच्या निवडीसाठी एकमेव मंगल मार्ग
दर रविवारी 'लोकसत्ता'तून
जीवनसाथी

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (अॅडव्हर्टायझिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तिंबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यान्वित करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.